शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्याबाबत.......

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः उपक्रम २३१५/प्र.क्र.१२२/एस.डी.४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०९ जून,२०१५

**प्रस्तावना :-**

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार प्रत्येक बालकाचे नाव पटावर नोंदवले जाणे आवश्यक आहे. पटावर नोंदवले गेलेले प्रत्येक बालक दररोज शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा हक्क आता कायदयाने मान्य केला आहे.

शाळा बालकांचे भावविश्व घडविते सामाजिक विकासात आणि राष्ट्राच्या जडण घडणीत शाळेचे अव्दितीय स्थान मान्य करावेच लागेल. उक्त अधिनियम २००९ नुसार बालकांना शाळेत प्रवेशीत करून त्याला हसत खेळत आनंददायी शिक्षण देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. शाळातुन दिले जाणारे शिक्षण हे जीवनदायी आहे अशी शिक्षण हक्क कायद्याची फलनिष्पत्ती आहे. दर्जेदार शिक्षणासाठी शासन कटिबध्द असून प्रत्येक मुल पटावर नोंदवले जाऊन ते नियमित शाळेत येणे यासाठी राज्यभर विविध स्तर आणि पातळयांवर नवोपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

दीर्घ सुटयांच्या आनंदानंतर विद्यार्थी जेव्हा शाळेत येतील तेव्हा त्यांना त्यांची शाळा हवीहवीशी वाटली पाहिजे. शाळा परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रेरणादायी असल्यास सुट्टयानंतर बालकांना शाळेची ओढ लागेल. शिक्षक आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी शाळा पूर्व दिनी शालेय व्यवस्थापन समिती आणि गावातील /वार्डातील युवक युवती मंडळे बचतगट यांच्या सहकार्यातून उपलब्ध संसाधनाच्या साहयाने शाळा परिसर स्वच्छ करून,सडा टाकून, रांगोळी काढून गावातील उपलब्ध फुले आणि पानांची तोरणे बांधून वर्ग खोल्यांना सुशोभित करून शाळा सुशोभित केल्यास विद्यार्थ्यांना शाळा अधिकाअधिक आवडू लागतील.

दिनांक १५ जून २०१५ रोजी राज्यात शाळा प्रारंभ होत आहेत. हा प्रारंभ चैतन्यमय आणि उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळते ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन राज्यात "शाळा प्रवेशोत्सव" मोठया उत्साहात आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालील शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू होण्याच्या प्रथम दिवशी सर्व शाळांमध्ये नव्याने प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा प्रवेशोत्सव हा कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय